बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २००६ अन्वये

# नोंदणी प्रमाणपत्र

(कलम ३४(३) व नियम २३ अन्वये )

क्रमांक : 0622

जा. क्र. मबाविआ/नो.प्र./2011/7543 दिनांक 31/12/2010

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आम्ही सेवक संस्था हासेगांव संच. सेवालय एचआयव्ही/एड्स संक्रमित मुलांचे बालगृह हासेगांव ता: औसा जि. लातूर यांना

दिनांक 22/11/2010 पासून ( ५० पन्नास ) बालक / बालिकांसाठी गृह म्हणून निवासी संस्था चालविण्याकरिता वरील अधिनियमाचे व नियमांचे अटी-शर्ती व निकष आणि उपबंधाचे अधीन राहून नोंदणी प्रमाणपत्र देत आहेत.

(१) बालकांना अन्न, वस्त्र, वैद्यकीय सेवा, सुविधा, ज्ञान-मनोरंजन, शिक्षण-प्रशिक्षण, समुपदेशन आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सोई-सुविधा आणि सेवा उपलब्ध करुन देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(२) मुली व मुलांसाठी स्वतंत्र इमारतीत निवास व्यवस्था असावी.

(३) व्यवस्थापन संस्थेत अभ्यागत नोंदवही ठेवेल व त्यात सर्व अभ्यागतांचा तपशिल नोंदविण्याची दक्षता घेईल.

(४) संस्था व्यवस्थापन लेखा पुस्तके, जडसंग्रह नोंदवही, अन्नधान्य व आहार नोंदवही आणि इतर सर्व आवश्यक नोंदवह्या अद्यावत ठेवील व शासन, आयुक्त आणि आयुक्तालयाचे प्रतिनिधी यांचेकडून मागणी होईल तेव्हा प्रत्येक चौकशीच्या वेळी, तपासणीसाठी उपलब्ध करुन देईल.

(५) नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयाच्या दर्शनी भागात ठळक जागी लावण्यात येईल.

(६) व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यात झालेला बदल तात्काळ जिल्हा कार्यालयास व आयुक्तालयास कळविणे बंधनकारक राहील.

(७) संस्था कार्यकारणीत शासकीय अधिकारी / कर्मचारी असणार नाही.

(८) संस्था एक व्यक्ति अथवा विशिष्ट समुहाच्या फायद्यासाठी चालविण्यात येणार नाही.

(९) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) सुधारीत अधिनियम आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) नियम यामध्ये अंतर्भूत सर्व तरतूदी संस्थेवर बंधनकारक राहतील. त्यांचा भंग झाल्यास आणि संस्थेचे कामकाज असमाधानकारक आढळल्यास अनुदान /विनाअनुदान तत्वावर दिलेली मान्यता काढून घेण्यात येईल व संस्थेस प्रदान करण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

(१०) बालकांशी वागणूक व त्यांचा उपयोग याबाबत गैरप्रकार घडल्यास सुधारित बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २००६ च्या कलम २३, २४, २५ व २६ मधील तरतुदीनुसार संस्था कारवाईस पात्र राहील.

(११) संस्थेच्या गृहाची जागा बदलण्यासाठी आयुक्तालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

(१२) हे नोंदणी प्रमाणपत्र म्हणजे अनुदानास पात्र असल्याची मान्यता आहे असे गृहीत धरता येणार नाही.

दिनांक : 22/11/2010

ठिकाण : पुणे

आयुक्त

महिला व बाल विकास

महाराष्ट्र राज्य, पुणे-१